**कौ. हि. म. सं. अर्ज क्र.१७२/२०२४**

**शुभांगी वगैरे १ वि. संदिप व इतर ६**

**CNR No. MH-JG-1200-1469-2024**

**आदेश निशाणी क्र.०४ वर**

**(पारीत दिनांक १२/०६/२०२६)**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ कलम २३ (१) प्रमाणे, अंतरीम खावटीचा आदेश होवुन मिळणे करीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तूतचे प्रकरणात, सामनेवाला क्र.१ यांचा मुळ अर्जास व अंतरिम अर्जास कैफियत / खुलासा नि.क्र. ३० वर दाखल करण्यात आला आहे.

३. अर्जदारांतर्फे विधिज्ञ श्री. एन.आर.पाटील यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला तथा त्यांनी नि.क्र.२२ वर लेखी युक्तीवाद सुध्दा दाखल केला आहे. प्रस्तूतचा अर्ज या न्यायालयाचे दिनांक १४/०७/२०२५ च्या आदेशानुसार सामनेवाला यांचे युक्तीवादाशिवाय निकाली काढण्यात येत आहे.

४. अभिलेखावरील कागदपत्रांचे काळजीपुर्वक अवलोकन केले. अर्जदार यांनी मा. सर्वोच्च न्यायालय यांचा रजनिशी –वि– नेहा, फौजदारी अपील क्र. ७३०/२०२० मधील निर्देशानुसार मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र अर्जदारातर्फे (निशाणी क्र.०६) वर दाखल केले आहे. सामनेवाला क्र. १ याने वारंवार संधी देउन सुध्दा मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र विहित

नमुन्यात शपथपत्र दाखल केलेले नाही.

**५.** अर्जदार हिचे अर्जातील कथन, सामनेवाला यांचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे व यावरुन प्रस्तुतच्या अर्जाच्या अनुषंगाने पुढील मुद्दे माझे समोर उपस्थित होत आहेत. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवित आहे–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार नं. १ ते २ यांनी मागणी केल्याप्रमाणे सामनेवाला नं.१ याचे कडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | अंशतः होकारार्थी. अर्जदार क्र.१ यांना दरमहा र.रु.३,०००/– आणि अर्जदार क्र.२ हिस दरमहा र.रु.२,०००/– (एकुण रक्कम पाच हजार दरमहा). |
| २. | काय आदेश ? | अंशतः मंजुर. |

**<u>कारणमीमांसा</u>**

**<u>मुद्दे क्र.१ व २ करिता:–</u>**

**६.** प्रस्तुत दोन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याकारणाने त्यांची कारणमीमांसा एकत्रीत करणेत येत आहे.

७. महिलांचा कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ च्या कलम २० नुसार अर्जदार हिने प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यानंतर मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम स्वरुपात पोटगी मागितली आहे. अर्जदाराच्या कथनावरुन अर्जदार व सामनेवाला हे पती पत्नी असुन त्यांच्यातील नातेसंबंध अद्यापर्यंत कायम असल्याचे स्पष्ट होत आहे. तिचे कथनानुसार अर्जदार नं १ हिने सामनेवाल्या विरुध्द मे. कोर्टात कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ प्रमाणे याच प्रकरणात अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नं १ व २ हे मागील सहा महिन्या पासून सामनेवाल्यामुळे माहेरी वेगळी राहत आहे. तीला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे अर्जदार नं १ व २ हे अर्जदार नं १ यांच्या वडिलांवर अवलंबून राहावे लागत आहे. तिला स्वताचे पालन पोषण करण्यासाठी दरमहा २०,०००/– इतका खर्च येतो. अर्जदार नं २ ही शालेय शिक्षण करत असून अर्जदार नं २ यांचे शालेय शिक्षणाची कोणतीह काळजी सा.वाले यांनी घेतलेली नाही. अर्जदार नं २ हिला शालेय शिक्षण साठी व योग्य ती शिकवणी करण्यासाठी दरमहा १५,०००/–इतका खर्च येतो. अर्जदार नं १ यांचे राहण्याचे व खाण्याचे अत्यंत दयनीय परीस्थित दिवस काढत असून सा.वाले यांनी अर्जदार यांची कोणतीही काळजी घेतलेली नाही. सामनेवाल्यावर अर्जदार नं १ व २ यांची पालन पोषणाची जबाबदारी असून ही सामनेवाल्याने संपुर्ण दुर्लक्ष केले आहे. आजपर्यंत कोणतीही व्यवस्था सागनेवाल्याने केलेली नाही. उलट सा.वाले हे सधन असून शेती, नोकरी, गावात सा.वाले नं २ ते ५ यांचे किराणा दुकान, या पासून भस्मोस उत्पन्न मिळवत असून सा.वाले नं १ यांचे दरमहा उत्पन ४०,०००/– (चाळीस हजार) असून बाकी सा.वाले नं २ ते ५ यांचे उत्पन्न सुमारे १,००,००० (अक्षरी एक लाख) एवढे आहे.

सा.वाला नं १ यांचे नावावर स्वतंत्र घर मिळकत असून सा.वाले यांनी वास्तविक पाहता अर्जदार यांना देणे चंधनकारक आहे. सा.वाले यांचेवर अर्जदार नं १ व २ यांच्या व्यतिरिक्त कोणीही अवलंबून नाही. अर्जदार नं १ व २ यांनी दाखल केलेला मुळ अर्जाचा निकाल ला अधिक चा अवधी लागणार असून अर्जावर लवकर चौकशी होऊन निकाल लागण्यास बराच कालावधी लागू शकतो. अर्जदार नं १ व २ यांना दरम्यानची खावटी न मिळाल्यास अर्जदार नं १ व २ यांच्यावर उपासमारीचे जिवन जगावे लागेल, त्यासाठी अंतरीम खावटी मिळणे आवश्यक आहे. अर्जदार नं १ व २ यांना अंतरीम खावटी म्हणून अन्न, वस, निवारा, औषध या साठी दरमहा रु. २०,०००/– देण्याचा हुकूम सा.वाले नं १ ते ७ यांना करावा ही विनंती केली आहे. अर्जदार नं २ यांच्या शालेय शिक्षण साठी दरमहा १५,०००/– देण्याचा हुकूम सा.वाले नं १ ते ७ यांना करावा ही विनंती केली आहे. इतर योग्य ते आदेश व हुकुम अर्जदार नं १ व २ यांच्या लाभात व्हावेत ही विनंती केली आहे.

८. अर्जदार हिच्या कथनानुसार, तिला घरकामाशिवाय अन्य कोणताही कामधंदा येत नाही. अर्जदार हिस उत्पन्नाचे काहीएक साधन नाही. अर्जदार ही स्वतःचा चरितार्थ स्वतः भागवू शकत नाही व ती त्यास असमर्थ आहे. अर्जदार यास प्रत्येकी २०,०००/– हजार रुपये प्रमाणे अन्न, वस्त्र व परिरक्षणासाठी खर्च येतो. सामनेवाले हे सधन असून शेती, नोकरी, गावात सामनेवाले नं.२ ते ५ यांचे किराणा दुकान यापासून भरगोस उत्पन्न मिळवत असून सामनेवाले नं. १ यांचे दरमहा उत्पन्न ४०,०००/– रुपये बाकी सामनेवाले यांचे उत्पन्न सुमारे १,००,०००/– रुपये आहे. सामनेवाले नं. १ याचे नावावर स्वतंत्र आहे. सबब सा.वाला क्र. १ ची अर्जदार हीस

दरमहा प्रत्येकी रुपये २०,०००/– प्रमाणे खावटी खर्च देण्याची ऐपत असून, ती त्याची नैतिक जबाबदारी आहे. अर्जदार क्र.१ ने दाखल केलेल्या मुळ अर्जाची चौकशी होऊन त्याचा अंतीम निकाल लागण्यास बराचसा कालावधी लागेल तो पावेतो अर्जदाराची उपासमार होईल. म्हणून मुळ अर्जाचा निकाल लागे पावेतो अर्जदार हीस प्रत्येकी रुपये २०,०००/– प्रमाणे आंतरिम खावटी मिळणे, प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून मिळणे आवश्यक व जरुरीचे आहे. सामनेवाला क्र.१ ची आर्थिक परिस्थिती सधन आहे. त्यामुळे वरील प्रमाणे इंटेरियम खावटी रक्कम देण्याची सामनेवाला क्र.१ ची ऐपत असून ती त्याची नैतिक जबाबदारी आहे, त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

९. सामनेवाला क्र.१ याने दाखल केलेल्या त्यांचे म्हणणे (नि.क्र.३०) मध्ये अर्जातील केलेली मागणी अमान्य केली आहे. त्यांचे अर्जदारांसोबत असलेले नातेसंबंध मान्य केले आहे. त्यांचे खुलाशानुसार, वस्तुस्थिती अशी की, त्याचा विवाह अर्जदार नं. १ हिचेशी ता.३०/०६/२०२० रोजी हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे व जातीरिवाजाप्रमाणे वस्ती नामपुर येथे झालेला आहे. या विवाहाचा संपुर्ण खर्च सा.वाला नं.१ चे आई वडीलांनी केलेला आहे. या विवाहसंबंधातुन सा.वाला नं. १ पासून अर्जदार नं. १ हीस मुलगी नामे कु. चैतन्या वय. 3 वर्ष हि झालेली असून मुलगी चैतन्या अर्जदार नं. १ सोबत बहाळ येथे राहत आहे. या विवाहत सा.वाला नं. १ चे आई वडीलांनी अर्जदार नं. १ हिस 2 तोळे सोन्याची मंगलपोत, 7 ग्राम सोन्याचे कानातील झुबे, 3 नाम सोन्याची अंगठी, 4 ग्राम सोन्याचे मनीमंगळसुत्र तसेच पायातील चांदीचे जोडवे व चांदीच्या साखळ्या इत्यादी दागिने भेट दिले होते. लग्नानंतर अर्जदार नं. १ ही सा.वाला नं. १ कडे वस्ती

नामपुर येथे एकत्र कुटुंबात नांदावयास आलेत. यावेळी सा.वाला नं. १ चे आई वडील अर्जदार नं. १ व सा.वाला नं. १ तसेच सा.वाला न. १ चा भाऊ असे एकत्रात राहत होते. सुरुवातीचे 5 महिने अर्जदार नं. १ जेमतेम बरे नांदली मात्र अर्जदार नं. १ गरोदर आहे हे समजल्यानंतर अर्जदार नं. १ च्या वागण्यात सा.वाला नं.१ यास बदल जाणवू लागला. यावेळी अर्जदार नं.१ सा.वाला नं.१ च्या आई वडीलांचा अपमान करुन बोलत असे. यावेळी सा.वाला नं.१ ने अर्जदार नं.१ हिस समजावुन सांगण्याचा बराच प्रयत्न केला परंतु अर्जदार नं.१ सा.वाला नं. १ यास म्हणाली की, " तुम्ही आई आई वडीलांना वेगळे काढुन द्या घर तुमच्या नावावर आहे त्यांना वेगळे काढले नाही तर आपला संसार होणार नाही" असे म्हणून अर्जदार नं. १ ने वेगळे राहण्याची मागणी सा.वाला नं.१ कडे केली. सा.वाला नं. १ चे आई वडील वयस्कर असल्यामुळे व सा.वाला नं.१ हा आई वडीलांचा मोठा मुलगा असल्यामुळे स्वत्रंत राहणे शक्य झाले नाही. म्हणून अर्जदार नं.१ सा.वाला नं. १ चा देखील अपमान करीत असत आज ना उद्या मुलबाळ झाल्यावर अर्जदार नं. १ च्या स्वभावात बदल होईल या अपेक्षेने सा.वाला नं. १ अर्जदार नं. १ कडुन होणारा मानसिक त्रास सहन करीत राहिला. समाजातील प्रचलीत रुढीप्रमाणे सातव्या महिन्याची गरोदर असतांना अर्जदार नं. १ चा नामपुर येथे ओटी भरण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने सा.वाला नं. १ व त्यांचे आई वडीलांनी पार पाडला व समाजातील रिवाजाप्रमाणे अर्जदार नं. १ ओटी भरल्यानंतर अर्जदार नं. १ तीच्या आई वडील व बहिण यांच्यासोबत मेरी बहाळ येथे निघुन गेली. अर्जदार नं.१ ही तारीख ६ जुन २०२१ रोजी स्वप्नदीप हॉस्पीटल चाळीसगाव येथे बाळांत झाल्यानंतर अर्जदार नं.१ आणि मुलगी कु. चैतन्या हीस सा.वाला, हे अर्जदार नं. १ चे माहेरी बहाळ येथे पाहण्यासाठी गेले असता,

सा.वाला नं. १ ने अर्जदार नं. १ हीस घेण्यासाठी दिड महिन्यांनंतर येणार असल्याचे सांगितले. मुलगी चैतन्या झाल्यानंतर सा.वाला नं.१ ने सांगितल्याप्रमाणे सा.वाला नं.१ अर्जदार नं.१ हीस दिड महिन्यानंतर घेण्यास गेला असता अर्जदार नं.१ व अर्जदार नं.१ चे आई वडीलांनी सांगितले की, " तुम्ही आई वडीलांनी वेगळे काढल्याशिवाय मी नांदावयास येणार नाही" म्हणुन अर्जदार नं.१ ने नांदण्यास येण्यास नकार दिला. सा.वाला नं. १ ने अर्जदार नं. १ ची वाट पाहिली, परंतु, अर्जदार नं.१ ने सा.वाला नं. १ सोबत काहीएक संपर्क ठेवला नाही. सा. वाला नं. १ ने अर्जदार नं. १ हिस फोनवरुन अर्जदार नं.१ ने सा.वाला नं. १ कडे नांदावयास यावे म्हणून विनवण्या करीत होते. परंतु अर्जदार नं. १ ने तीच्या वेगळे राहण्याचा हट्ट सोडला नाही. सा.वाला नं. १ चा नाईलाज झाला म्हणून सा.वाला नं. १ हा मुलगी चैतन्या ही ६ महिन्यांची झाल्यानंतर अर्जदार नं. १ हीस घेण्यासाठी बहाळ येथे गेले. यावेळी देखील अर्जदार नं.१ ने आई वडीलांना वेगळे काढण्याची अट कायम ठेवली. सा.वाला नं.१ यास अर्जदार नं.१ हिचेशी प्रामाणिकपणे संसार करावयाचा असल्यामुळे सा.वाला नं. १ ने त्याच्या आई वडीलांना वेगळे काढण्यापेक्षा स्वतः वेगळे राहण्याचा निर्णय घेऊन अर्जदार नं.१ ची वेगळे राहण्याची अट मान्य केली व अर्जदार नं. १ हीस १० डिसेंबर २०२१ रोजी मुलीसह नांदावयास नामपुर येथेच भाड्याने स्वतंत्र खोली घेऊन संसार थाटला. सामनेवालेचे म्हणणे नुसार, स्वतंत्र राहुनही अर्जदार नं.१ चे सा.वाला नं. १ च्या संसारात मन रमत नव्हते. अर्जदार नं. १ सा.वाला नं. १ यास म्हणत असत की, "तुम्ही तुमच्या आई वडीलांशी संबंध ठेवू नका तुम्ही त्यांच्याकडे जाऊ नका" असे म्हणून मानसिक त्रास देत होती. त्याचवेळी अर्जदार नं.१ सा.वाला नं.१ यास असेही म्हणत होते की, " तुम्ही नामपुरला राहिले तर

आई वडीलांशी संबंध तोडणार नाहीत तुम्ही नाशिक पुणे येथे राहिलात तरच मी तुमचेशी संसार करेल " असे म्हणुन अर्जदार नं.१ त्रास देत राहिली. सा.वाला नं.१ याने नाशिक पुणे येथे जाण्याचे नाकारल्यामुळे अर्जदार नं. १ सा.वाला नं.१ यास न विचारता माहेरी बाहाळ येथे ता.१०/१०/२०२३ रोजी निघुन गेलेत. सा.वाला नं. १ याचा संसार तुटू नये म्हणून सा. वाला नं. १ हा नाशिक येथे कामाच्या शोधात ता. १५/१०/२०२३ रोजी गेले असता, अर्जदार नं.१ च्या वडीलांनी अर्जदाराचा घरसंसार देखील बाहाळ येथे आणला. सा.वाला नं. १ ने नाशिक येथे एम.एस. के.एच सिटींग सिस्टीम या कंपनीत ड्रायव्हर म्हणून काम मिळवले व अर्जदार नं.१ हीस तसा निरोप दिला. काही दिवस काम केल्यानंतर सा.वाला नं. १ ने नाशिक येथे अर्जदार नं. १ हीस राहण्यासाठी खोली शोधली व सा.वाला नं. १ व अर्जदार नं. १ हीस घेण्यासाठी अर्जदार नं.१ चे माहेरी ५ जानेवारी २०२४ रोजी गेले व अर्जदार नं.१ हीस अर्जदार नं.१ च्या वडीलांनी आणलेल्या सामानापैकी आर्ध्या सामानासह पिकअप गाडीने नाशिक येथे अर्जदार नं.१ हीस मुलीसह घेऊन गेला. अर्जदार नं. १ ही नाशिक येथे नांदण्यास आली त्यावेळी देखील अर्जदार नं.१ सा.वाला नं १ मुलगी चैतन्या असे राहत होते. अर्जदार नं.१ हीस खोली पसंत नसल्याच्या तक्रारी अर्जदार नं. सा.वाला नं. १ कडे करुन खोली बदलून घेण्याचे सांगत होती. पहिल्या खोलीत तीन महीने राहिल्यानंतर सा.वाला नं.१ ने ११/०४/२०२४ रोजी अर्जदार नं. १ च्या आग्रहाखातर दुसरी खोली घेतली. अर्जदार नं.१ चे वडील हे आर्थिक अडचणीत असल्यामुळे सा.वाला नं. १ कडे रक्कम रुपये वीस हजाराची मागणी केली. परंतु सा.वाला नं.१ स्वतः आर्थिक अडचणीत असल्यामुळे मदत करण्यास नकार दिला या कारणावरुन अर्जदार नं.१ ने सा. वाला नं.

१ यास ता.२५/०५/२०२४ रोजी" बाराच्यापोटचा, तुझ्या नंगटशी मला संसार करावयाचा नाही मी दुसरा नवरा करुन घेईन मला आता नांदायचेच नाही" यावेळी अर्जदार नं.१ सा.वाला नं. १ चा स्वयंपाक देखील करत नसत सा.वाला नं. १ ने आज ना उद्या अर्जदार नं. १ च्या स्वभावात बदल होईल म्हणुन कसे तरी दिवस काढलेत. परंतु अर्जदार नं. १ ही सा.वाला नं. १ घरी नसतांना व सा.वाला नं.१ यास न विचारता ता.०१/०६/२०२४ रोजी मुलगी चैतन्या हिला घेऊन अर्जदार नं. १ ही माहेरी निघुन गेली. त्यानंतर सा.वाला नं. १ ने अनेक प्रयत्न केलेत परंतु अर्जदार नं. १ ने दाद दिली नाही. अर्जदार नं.१ चे काका भावलाल शामराव चौधरी यांच्या अंतविधीस सा.वाला नं. १ व त्यांचे आई वडील आणि भाऊ असे ता.२२/०७/२०२४ रोजी बहाळ येथे गेले त्यावेळी देखील अर्जदार नं.१ ने सा.वाला नं.१ शी व त्याचे आई वडीलांशी व्यवस्थित बोलली नाही. रागातच अर्जदार नं. १ हातवारे करत राहिली. त्यानंतर सा.वाला नं.१ पुन्हा ता.०३/०८/२०२४ रोजी अर्जदार नं.१ च्या काकांच्या गंधमुक्तीच्या कार्यक्रमास गेला असता तेव्हा अर्जदार नं. १ ची बहिण मयुरी सतीश चौधरी हिने देखील सा.वाला नं. १ यास "बाराच्यांपोटचा तु कशाला येतो असे म्हणुन शिवीगाळ केली" अर्जदार नं.१ हीने देखील सा.वाला नं.१ व त्याचे आई वडीलांना मुलगी चैतन्या हिच्याशी बोलु दिले नाही अथवा जवळ येऊ दिले नाही. अर्जदार नं. १ ने त्यावेळी देखील सा.वाला नं. १ कडे घटस्फोटाची मागणी केली. अर्जदार नं.१ हीस नांदविण्यासाठी सा.वाला नं. १ व त्यांचे आई वडील, काका विलास रघुनाथ चौधरी, मामा भिकन सुकलाल चौधरी, व सा.वाला नं. १ चे मामेभाऊ हेमराज भिकन चौधरी सा. वाला नं. १ ची मामी शोभाबाई भिकन चौधरी असे अर्जदार नं. १ हीस घेण्यासाठी ता. ११/०८/२०२४

रोजी बहाळ येथे अर्जदार नं.१ चे माहेरी दुपारी ३ वाजेचे सुमारास गेले असता अर्जदार नं. १ सा.वाला नं. १ यास म्हणाली की, " तु एकटा का आला नाही, यांना कशाला आणले मला घटस्फोट पाहिजे, मी तुझ्याकडे नांदणार नाही" यावेळी देखील अर्जदार नं.१ ने मुलीला जवळ येऊ दिले नाही. यावर सा.वाला नं. १ च्या आई वडीलांनी समजविले असता त्यांना देखील अर्जदार नं.१ ने रांड, भडवा म्हणून शिवीगाळ केली. त्याचवेळी अर्जदार नं. १ च्या आई वडीलांनी देखील" आम्ही मुलीला पाठवणार नाहीत तिसरा नवरा करुन देऊ तो पहिलाही नालायक होता आणि तुम्हीपण नालायक आहात" असे म्हणुन अपमानास्पद वागणुक दिली. अर्जदार नं. १ हीस तिचे आई वडील व बहिण मयुरी असे चिथावणी देत होते व त्या चिथावणीवरुन अर्जदार नं. १ घटस्फोटाची मागणी करीत असे. अर्जदार नं.१ च्या आई वडीलांनी अर्जदार नं. १ हीस तिसरा नवरा करुन देण्याची भाषा वापरली बाबाबत सा.वाला नं. १ ने रात्रीतन सखोल चौकशी केली तेव्हा सा.वाला नं.१ यास माहिती मिळाली, की अर्जदार नं. १ हिने या विवाहापूर्वी नरेंद्र सुरेश चौधरी रा. यशवंत नगर भडगाव येथील नोकरीने पोलीस. इसमांशी ता. १२/१२/२०१७ रोजी विवाह केलेला होता. अर्जदार नं. १ ने ही महत्वाची माहिती सा.वाला नं. १ शी विवाह करतांना लपवुन ठेवली सा.वाला नं. १ च्या आई वडीलांनी अर्जदार नं.१ हीस विवाहावेळी दिलेले सोन्याचे दागदागिणे देखील अर्जदार नं.१ माहेरी सोबत घेऊन गेलेली असून परत केलेले नाहीत. अर्जदार नं. १ च्या आई वडीलांनी सा.वाला नं. १ ची जावायाची मर्जी सोडून शिवीगाळ देखील केली होती व अर्जदार नं.१ व तिचे आईने सा.वाला नं. १ व त्यांचे नातेवाईकांना जेलमध्ये बसविण्याची धमकी दिली. सदर घटनेची फिर्याद सा.वाला नं.१ मेहूणबारे पोलीस स्टेशनला देणार होते परंतु

वेळेअभावी तशी फिर्याद देता आली नाही. सा.वाला नं.१ ने घटस्फोट द्यावा, असा दबाव आणण्यासाठी अर्जदार नं.१ ने नांदण्यास येण्याचे टाळून अर्जदार नं.१ व तिचे आई वडील त्रास देत राहिले. सामनेवालेचे म्हणणे नुसार, अनेकविध प्रयत्न करुनही अर्जदार नं.१ ने नांदण्याचे टाळले म्हणून सा. वाला नं.१ ने अर्जदार नं. १ हिस ता. १३/०८/२०२४ रोजी नोटीस दिली असता सदरची रजिष्टर नोटीस अर्जदार नं.१ हीस मिळुनही नोटीसीत नमुद केल्याप्रमाणे अर्जदार नं. १ ही नांदण्यास आली नाही. याउलट अर्जदार नं.१ ने ता.२१/०८/२०२४ रोजी खोट्या आशयाचे रजिस्टर नोटीस उत्तर पाठवून नोटीसीमध्ये रक्कम मागणीचे खोटे आरोप केलेत तसेच अर्जदार नं.१ ने सा.वाला नं.१ यास रक्कम दिल्याबाबतचे देखील खोटे कथन केले आहे. अर्जदार नं.१ ही ८ दिवसांच्या आत नांदावयास आली नाही. उलट पुरावा तयार करण्याच्या हेतुने ता.०४/०८/२०२४ व ता.१२/०८/२०२४ रोजी मेहूणबारे पोलीस स्टेशनमध्ये खोट्या तक्रारी करुन सा.वाला नं. १ व त्याचे कुटुंबियांना त्रासात टाकलेले आहे. परंतु सा.वाला नं.१ यास अर्जदार नं.१ शी प्रामाणिकपणे संसार करावयाचा असल्यामुळे सा.वाला नं. १ ने स्वतः व नातेवाईकांमार्फत अनेकविध प्रयत्न केलेत. सा.वाला नं.१ यास मुलगी चैतन्या हि झालेली आहे. मुलगी चैतन्या हिस अर्जदार नं.१ ने पितृप्रेमापासुन दुर ठेवलेले आहे. अर्जदार नं.१ ने सा.वाला नं.१ चा त्याग करुन सा.वालानं.१ यास संसार सुखापासुन वंचित ठेवलेले आहे. अर्जदार नं.१ हीस माहेरी राहण्यास कोणतेही सबळ कारण नाही. सा.वाला नं. १ चे वय तरुन असुन त्यास शरीर सुख व संसार सुखाची आवश्यकता आहे. अर्जदार नं.१ ही स्वेच्छेने माहेरी राहून सा.वाला नं. १ चा मानसिक छळ करीत आहे. अर्जदारांना स्वतंत्र पोटगी देण्याची सा.वाला नं. १ ची ऐपत नाही.

सा.वाला नं. १ आजही अर्जदार नं.१ हिला मुलीसह नांदविण्यास तयार आहे. अर्जदार नं.१ स्वेच्छेने मुलीसह माहेरी राहत असल्यामुळे पोटगी व इतर मागणी मागण्याचा अधिकार नाही. सा.वाला नं. १ हा मोलमजुरी करुन उदरनिर्वाह करतो. अर्जदार नं. १ ही इंग्रजी माध्यमिक शाळेत शिक्षीका म्हणून काम करते त्याचा पगार महीन्याला १०,००० रुपये मिळतो. त्याचप्रमाणे शिवण क्लास चालविते तसेच इतर वेळेत ब्यूटी पार्लरचे दुकान चालविते यापासून महिन्याला २०,००० ते २२,००० रुपये कमविते सा.वाला नं. १ पर्वाही व आजही नांदविण्यास तयार असल्यामुळे अर्जदार पोटगी मिळणेस पात्र नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे. अर्जदाराने तिच्या अर्जात असे नमुद केले आहे की, अर्जदार यास प्रत्येकी २०,०००/- हजार रुपये प्रमाणे अन्न, वस्त्र व परिरक्षणासाठी खर्च येतो. सामनेवाले हे सधन असून शेती, नोकरी, गावात सामनेवाले नं.२ ते ५ यांचे किराणा दुकान यापासून भरघोस उत्पन्न मिळवत असून सामनेवाले नं. १ यांचे दरमहा उत्पन्न ४०,०००/- रुपये बाकी सामनेवाले यांचे उत्पन्न सुमारे १,००,०००/- रुपये आहे. सामनेवाले नं. १ याचे नावावर स्वतंत्र आहे. याउलट सामनेवालेने या सर्व बाबी नाकरल्या असून तो मोलमजूरी करुन उदनिर्वाह करतो असे नमुद केले आहे. तयाचप्रमाणे अर्जदार क्र. १ हिला इंग्रजी माध्यमिक शाळेत शिक्षीका म्हणून दरमहा दहा हजार रुपये पगार मिळतो व शिवण क्लास आणि ब्युटी पार्लर यापासून दरमहिन्याला विस ते बाविस हजार रुपये कमाई असल्याचे खुलाशामध्ये नमुद केले आहे. मालमत्ता व दायित्वाबाबतच्या प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जदार यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे नमुद केलेले आहे. निशाणी क्र.०६ वरील अर्जदार यांचे मालमत्ता व दायित्वाबाबतचे प्रतिज्ञापत्रावरुन तिला घरकामाशिवाय

कोणताही कामधंदा येत नसल्याचे दिसुन येते. तसेच, अर्जदार ही अशिक्षीत आहे, परंतु तिस उत्पन्नाचे काहीही एक साधन नाही असे स्पष्ट होते. त्यामुळे, अर्जदार हिला कोणतेही उपजिविकेचे साधन नसल्यामुळे व ती स्वतः कमवित नसल्यामुळे ती स्वतःची आणि अर्जदार क्र.२ यांची उपजिविका भागविणेस असमर्थ आहे असे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे, सामनेवाला याने देखील अर्जदारास निश्चीत उत्पन्न असून त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही त्यामुळे, त्याने अर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. वास्तविकरीत्या अर्जदार हिने सामनेवाला याच्या उत्पन्नाबाबत मालमत्ता दायित्वाच्या शपथपत्रामध्ये तो, ४०,०००/– रुपये कमावतो असे नमुद केले आहे. परंतू, तयाबाबत कोणताही निश्चीत पुरावा दाखल नाही. अभिलेखावरील उपलब्ध कागपत्रांवरुन तो शारिरीक दृष्टया सक्षम असून, तयाचे वयानुसार, मोलमजुरीचे काम करतो असे गृहित धरलयास त्याला दररोज ३०० ते ५०० रुपये सहज मिळू शकतात, येणेप्रमाणे दरमहा तो ९,०००/– ते १५,०००/– रुपये कमावितो असा निष्कर्ष काढला जावू शकतो. सदरचे केलेले कथन शपथेवर असल्याने ग्राहय धरण्यास कोणतीही शंका उत्पन्न होत नाही. अर्जदार हिच्या पोलनपोषणाची जबाबदारी सामनवोला यांची कायदेशीर व नैतिक कर्तव्य आहे आणि त्यांनी ती पार पाडण्याचे दिसुन येत नाही.अर्जदार यांचे कथनावरुन ही बाब स्पष्ट होते की, जून २०२३ पासुन अर्जदार तिचे माहेरी नाईलाजाने राहत आहे. त्यामुळे, सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ यांचा पती आणि अर्जदार क्र.२ हिचा पिता म्हणुन सांभाळ करणे व उदरनिर्वाहाची व औषधपाण्याची व्यवस्था करणे यांची जबाबदारी आहे. असे असतांना अर्जदार हिस दैनंदिन जिवनातील जिवनावश्यक वस्तुंची सोय होणेसाठी अंतरिम पोटगी

मिळणे आवश्यक आहे. सबब, सामनेवाला क्र. १ याचे साधारणतः असणारे दरमहा उत्पन्न आणि दोन्ही अर्जदार यांच्या मुलभुत गरजा यासाठी लागणारा खर्च तसेच अर्जदार हिचे वय, शारीरिक गरजा, वैद्यकीय व शैक्षणिक खर्च या सर्व बाबींचा एकत्रीत विचार करता सामनेवाला कडुन अर्जदार क्र.१ हिला दरमहा रुपये ३,०००/– (रक्कम रुपये तिन हजार ) आणि अर्जदार क्र. २ हिला दरमहा रुपये २,०००/– (रक्कम रुपये दोन हजार ) अंतरिम पोटगी मंजुर करणे न्यायोचित होईल, असे या न्यायालयाचे मत झाले आहे. सबब, या सर्व नमुद कारणास्तव मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवुन, मुद्दा क्र.२ चे निष्कर्षासाठी, मी, खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## आदेश

१) अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२) सामनेवाला क्र.१ संदिप जगन्नाथ सुर्यवंशी याने अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाचे अंतिम निकालापर्यंत अर्जदार क्र.१ हिस दरमहा रुपये ३,०००/– (रक्कम तिन हजार रुपये) व अर्जदार क्र.२ हिस दरमहा रुपये २,०००/– (दोन हजार रुपये) असे एकूण दरमहा रुपये ५,०००/– (पाच हजार रुपये दरमहा) अंतरिम पोटगी द्यावी, असे आदेशीत करण्यात येत आहे.

३) सदर आदेशाची प्रत अर्जदार यांना मोफत देणेत यावी.

MINAKSHI MANOHAR DHANRAJ
Digitally signed by MINAKSHI MANOHAR DHANRAJ
Date: 2026.06.12 17:39:54 +0530

(श्रीमती एम.एम.धनराज)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र. १) चाळीसगांव.

दिनांकः–१२/०६/२०२६.

**<u>CERTIFICATE</u>**

" I affirm that the contents of this **<u>P.D.F.</u>** file Judgment are same word to word as per original Judgment."

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : C. Y. Chimankar. |
| Court Name | : Smt. Minakshi M. Dhanraj<br>Judicial Magistrate F. C., (Court No.1), Chalisgaon. |
| Date | : 12.06.2026. |
| Judgment/ order signed by presiding officer on | : 12.06.2026. |
| Judgment/order uploaded on | : 12.06.2026. |